# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### कुर्ला येथील लाल बहादूर शास्त्री मार्गावर झालेल्या बेस्ट बसच्या अपघात प्रकरणी नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(१) ६३ (१७-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला येथील लाल बहादूर शास्त्री मार्गावर दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या भीषण अपघातात ७ नागरिकांचा मृत्यू व अनेक नागरिक जखमी झाले असून सदर अपघाताची चौकशी करण्यासाठी तसेच बेस्टच्या सुरक्षित प्रवासासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी बेस्ट उपक्रमाचे तत्कालीन महाव्यवस्थापक यांनी पाच सदस्यीय समिती नेमली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने तयार केलेला अहवाल आणि मार्गदर्शक तत्वे अद्यापही जाहीर केला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा अहवाल सदरहू समितीने शासनास सादर केला आहे काय, अहवालात कोणकोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत, असल्यास, त्यातील कोणत्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत आणि तसेच अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, बृहन्मुंबई विद्युतपुरवठा आणि परिवहन उपक्रमाने (बेस्ट) या अपघातामागील कारणे व तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, मृतांच्या कुटुंबीयांना व जखमींना बेस्ट प्रशासनाकडून वा शासनाकडून तातडीने मदत मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

कुर्ला, मुंबई येथील एलबीएस मार्गावर दिनांक ०९ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या भीषण अपघातानंतर सदर अपघाताची चौकशी करण्याकरीता बेस्ट प्रशासनाव्दारे मुख्य व्यवस्थापक (वाहतूक) यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची अपघात चौकशी समिती स्थापन करण्यात आली.

(२) बेस्ट उपक्रमाच्या अपघात चौकशी समितीने अपघाताबाबतचा अहवाल मा.अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सादर करण्यात आलेला आहे.

(३) समितीने सुचविलेल्या व अंमलात आणलेल्या शिफारसी-

नवीन भरती झालेल्या बसचालकांना ईलेक्ट्रीक बसगाडीसह इतर प्रकारच्या बसगाड्यांवरही प्रशिक्षण दिले जाते.

वेळोवेळी बसचालकांची मध्यप्राशन चाचणी घेण्यात येते.

४० कि.मी. प्रति तास वेग मर्यादेने बसगाडी चालविण्याबाबत सर्व बसचालकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

बेस्ट उपक्रम तसेच कंत्राटदारांच्या बसगाड्यांच्या देखभालीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. रंग आंधळेपणा असलेल्या कर्मचाऱ्यांची तपासणी कठोरतेने करण्यात येत आहे.

(४) अपघातानंतर प्रशासनाव्दारे चौकशीअंती संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे व सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सदर अपघात हा बसचालकाच्या बेदरकारपणे वाहन चालवून व अक्षम्य निष्काळजीपणा केल्याने झाल्याचे निदर्शनास आले आहे. बेस्ट उपक्रमाव्दारे भविष्यात होणारे अपघात टाळण्याकरीता व्यवस्थापनाद्वारे खालील उपाययोजना अंमलात आणल्या आहेत.

बेस्ट उपक्रमाच्या स्वमालकीच्या तसेच भाडेतत्वावरील बसगाड्यांवर नियुक्त बसचालकांना २८ दिवसांचे वाहन चालन प्रशिक्षण देण्यात येत आहे.

वाहतूक व अभियांत्रिकी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या समन्वयाने मार्गावरील बस चालकांची वाहन चालन पध्दती तपासून त्यानुसार सदोष बसचालकांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

उपक्रमातील बस चालकांची तसेच भाडेतत्वावरील बसगाड्यांवर नियुक्त बस चालकांची वेळोवेळी श्वास विश्लेषक तपासणी (Breath Analyser Test) करण्यात येते.वाहतूक पोलीस व प्रादेशिक परिवहन विभाग यांच्या समन्वयाने उपक्रमातील चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्यासंबंधी समूपदेशन तसेच मार्गदर्शन करण्यात येते.

मुंबई शहरातील वाहतूकीस अडथळा ठरणाऱ्या रस्त्यांवरील अनधिकृत बांधकामे, फेरीवाल्यांची अतिक्रमणे व रस्त्यावरील दुतर्फा पार्किंग इ. वर वेळोवेळी कार्यवाही करण्याकरीता संबंधित आस्थापनांशी उदा. बृहन्मुंबई महानगरपालिका, वाहतूक पोलीस मुंबई व इतर आस्थापनांशी पत्र व्यवहार करुन सातत्याने कारवाई करण्याकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) सदर अपघातामध्ये जखमी झालेल्या प्रवासी नागरीकांना रुग्णालयातील उपचारानंतर घरी सोडण्यात आले. व उपचारापोटी आलेल्या खर्चाच्या रकमेची प्रतिपूर्ती बेस्ट उपक्रमाद्वारे करण्यात आली.

अपघातामध्ये मृत झालेल्या एकूण ९ व्यक्तींपैकी ८ मृतांच्या वारसदारांना उपक्रमाद्वारे नुकसान भरपाईपोटी रुपये २ लाख रकमेच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले असून, उर्वरित मृताच्या वारसाच्या धनादेशाचे वितरण कार्यालयीन प्रक्रीयेमध्ये अंतिम टप्प्यात आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेस अदा करावयाचे अनुदान व थकबाकी प्रलंबित असल्याबाबत

**(२) १०३ (१६-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.विक्रांत पाटील, ॲड.अनिल परब, श्री.शशिकांत शिंदे, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सुरू असलेले दीड लाख कोटी रुपयांचे प्रकल्प राबविणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुदत ठेवींमध्ये घट होत असून शासनाकडील थकबाकी गत वर्षाच्या तुलनेत दुप्पट झाली असून सद्य:स्थितीत एकीकडे उत्पन्नाचे स्त्रोत शोधत असताना सहायक अनुदान, मालमत्ता कर, पाणीपट्टी अशा विविध करांपोटी सुमारे १६ हजार ७०० कोटी रुपयांहून अधिक रक्कमेची थकबाकी आणि अनुदान शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून गेल्या ९ महिन्यात ५,८४७ कोटी रुपये इतक्या रकमेच्या मालमत्ता कराचे संकलन करण्यात आले असून उर्वरित १ हजार कोटींची वसुली अद्याप बाकी असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शासनाच्या विविध विभागांना पाणी पुरवठ्याबरोबरच अनेक सुविधा पुरविण्यात येत असून प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या खर्चासाठी शासनाकडून महानगरपालिकेला देण्यात येणाऱ्या सहाय्यक अनुदान, पाणीपट्टी आणि मालमत्ता कराचा शासनाच्या विविध विभागांनी मागील वर्षभरात महानगरपालिकेकडे भरणा केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईच्या सुशोभिकरणावर आतापर्यंत किती निधी खर्च केला गेला आहे, सदर कामांकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुदतठेवी (एफडी) मोडून किती रुपये खर्च झाले आहेत व सदर खर्च कोणकोणत्या कामांसाठी केला गेला आहे, याबाबत शासन खुलासा करणार आहे काय,

(५) असल्यास, आर्थिक वर्ष सन २०२१-२२ मध्ये रुपये ९१ हजार कोटींवर गेलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या मुदतठेवी सद्य:स्थितीत रुपये ८१ हजार कोटीपर्यंत घटल्या असून गत दोन वर्षात राखीव निधीमध्ये सुमारे १० हजार कोंटीची घट झाली असून माहे मार्च,२०२५ पर्यंत सर्व कंत्राटदारांची देणी दिल्यानंतर या निधीत आणखी घट होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मुंबईत ५०० मोठ्या मालमत्ताकराच्या थकबाकीदारांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केली असून सदर थकबाकीदारांनी सन २०१० पासून किंवा त्याआधीपासून महानगरपालिकेचा सुमारे रुपये ३९८१ कोटी एवढया रक्कमेचा मालमत्ता कर थकविला असून त्यात विकासक, आस्थापना व शासनाचे विविध विभाग यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस विकासकामांकरीता हजारो कोटींची थकीत थकबाकी - अनुदान तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, तसेच मालमत्ता कर चुकविणाऱ्या व थकविणाऱ्यांवर कारवाई करुन सदर थकबाकीदारांकडून मालमत्ता कर वसुल करण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०२-२०२६) :** (१) हे अशंत: खरे आहे.

दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या खर्चासाठी थकित अनुदान रुपये ६५८१.०८ कोटी व विविध विभागांकडून मलनि:सारण आकार व जल आकारापोटी रुपये ७८०.६५ कोटी व मालमत्ता कर रुपये १८७९.९० कोटी असे एकूण रुपये ९२४१.६३ कोटी इतक्या रक्कमेची थकबाकी बृहन्मुंबई महानगरपालिकेस येणे आहे.

(२) दिनांक ०१/०४/२०२४ ते दिनांक ३१/०३/२०२५ या आर्थिक वर्षात थकीत मालमत्ता धारकांकडून रुपये ६१९९.५४ कोटी मालमत्ता कराची वसुली करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईच्या शुशोभिकरणावर सन २०२२-२३ मध्ये रुपये ४९९.८८ कोटी, सन २०२३-२४ मध्ये रुपये ४४३.६७ कोटी व सन २०२४-२५ मध्ये रुपये १२४.७१ कोटी असे एकूण रुपये १०६८.२६ कोटी खर्च करण्यात आला आहे. सदर खर्च बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुदतठेवी मोडून केलेला नाही.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेची दिनांक ३१/०३/२०२२ रोजी रुपये ९१६९०.८५ कोटी, दिनांक ३१/०३/२०२३ रोजी रुपये ८६४०१.५३ कोटी, दिनांक ३१/०३/२०२४ रोजी रुपये ८२७३७.१५ कोटी व दिनांक ३१/०३/२०२५ रोजी रुपये ७९४९८.६० कोटी इतकी मुदत ठेवीतील वर्षनिहाय रक्कम आहे.

(६) हे खरे आहे.

(७) मालमत्ता कर चुकविणाऱ्या व थकविणाऱ्यांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ कलम २०२ च्या तरतूदीनुसार थकित मालमत्ताकराच्या देय दिनांकापासून २% प्रति माह या दराने संगणकीय प्रणालीद्वारे दंड आकारणी करण्यात आली आहे. तसेच, कलम २०३ ते २०६ च्या तरतुदींनुसार चल मालमत्तांची अटकावणी, अचल मालमत्तांची जप्ती अटकावणी व लिलाव, इ. कार्यवाही करण्यात येते. मुंबई महानगरपालिकेद्वारे एकूण ४७१८ मालमत्तांवर जप्ती व अटकावणीची कारवाई करण्यात आली आहे. कारवाईतून १४४६ मालमत्तांधारकांकडून रुपये ३७७.४९ कोटी इतका मालमत्ता कर वसूल करण्यात आला आहे.

---

## मुंबईतील मॉलमधील सुरक्षितेचे निकष न पाळणाऱ्या गेमिंग झोनविरुध्द कारवाई करणेबाबत

**(३) १९१ (१७-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रत्येक मॉलमध्ये लहान मुलांसाठी असणाऱ्या गेमिंग झोनमध्ये सुरक्षेचे कोणतेही निकष पाळले जात नसल्याने लहान मुले आणि त्यांच्या पालकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजकोटमधील गेमिंग झोनच्या ठिकाणी झालेल्या दुर्घटनेमुळे मुंबईतील मॉलमध्ये असलेल्या गेमिंग झोनमध्ये सुरक्षेचे निकष पाळण्यात येत आहेत किंवा कसे याची तपासणी शासनाने केली आहे काय, तपासणीत काय आढळून आले सुरक्षितेचे निकष न पाळणाऱ्या मुंबईतील मॉलमधील गेमिंग झोनविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) गुजरातमधील राजकोट गेमिंग झोनमध्ये ३५ जणांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील एकूण ६८ मॉल यांचे विशेष तपासणी मोहिमे अंतर्गत दिनांक २६/०५/२०२४ ते दिनांक ३०/०५/२०२४ या कालावधीत तपासणी करण्यात आली.

त्यामध्ये ४७ मॉल मधील अग्निप्रतिबंधक व अग्निसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत व कार्यान्वित असल्याचे आढळून आले व १८ मॉल मधील अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित नसल्याचे आढळल्याने त्या आस्थापनांना 'महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाययोजना अधिनियम २००६' अन्वये फॉर्म 'जे' नोटीस बजाविण्यात आल्या. त्याचप्रमाणे ०३ मॉल बंद स्थितीत आढळले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील दहिसर टोल नाक्यावर पंचतारांकित हॉटेल उभारण्यात येणार असल्याबाबत

**(४) २९४ (१७-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील दहिसर टोल नाक्यावर असलेल्या मोकळया भूखंडावर १३१ खोल्यांचे पंचतारांकित हॉटेल उभारण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पंचतारांकित हॉटेल उभारण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेस मोठ्या निधीची गरज असून सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेची आर्थिक बाजू सक्षम नसल्यामुळे जमा असलेल्या मुदतठेवीदेखील मोडण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदर हॉटेल उभारणीस निधीची तरतूद कशाप्रकारे करण्यात येणार आहे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने उत्पन्न वाढविण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सदर भूखंडावर "परिवहन व व्यावसायिक केंद्र" उभारण्याच्या प्रस्तावामध्ये प्रवाश्यांच्या व नागरिकांच्या सुविधेसाठी १८६ खोल्यांचे ट्रान्झिट हॉटेल प्रस्तावित करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

आर्थिक वर्ष सन २०२४-२५ व आर्थिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये अद्यापपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने एक ही मुदत ठेव मोडलेली नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ मध्ये सदर कामाकरीता रुपये १५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत

**(५) ३५१ (१७-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व सफाई कामगारांना लाड-पागे समितीच्या शिफारशी लागु कराव्यात अशी मागणी म्युनसिपल युनियनने केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणामुळे सुमारे १५ ते २० हजार कामगार देय असलेल्या लाभांपासून वंचित असल्याची तक्रार म्युनसिपल युनियनने बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु निवेदनाच्या अनुषंगाने सर्व सफाई कामगारांना लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेत ज्या पदास वारसहक्क नोकरी धोरण लागू आहे अशी पदे निश्चित केलेली आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदांची संख्या सुमारे ३४००० इतकी आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रातील निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका परिपत्रक क. प्रकाअ/०१, दिनांक १६ एप्रिल,२०२५ अन्वये शासन निर्णय क्रमांक-सफाई ४६/ सआक दिनांक २४ फेब्रुवारी,२०२३ नुसार घन कचरा व्यवस्थापन खात्यातील सफाई कामगारांना लाड व पागे शिफारशी लागु केलेल्या आहेत. सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने वारसाहक्क नोकरीचा लाभ नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त, १५ वर्षाची अर्हकारी सेवा पूर्ण केल्यानंतर स्वेच्छानिवृत्ती, सेवेत असताना निधन, महानगरपालिका वैद्यकीय परिक्षकांनी पुढील सेवेसाठी कारणास्तव कायमस्वरुपी असमर्थ ठरविलेल्या सफाई कामगारांच्या वारसास नोकरी देण्यात येते. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त संघटनांनी महानगरपालिकेच्या विविध खाते/विभाग/रुग्णालयातील कामगार/आया/कक्ष परिचर/हमाल इत्यादी पदास वारसाहक्क नोकरीचे धोरण लागू करण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक ०६ सप्टेंबर,२०२४ रोजीचे पत्र प्राप्त असून पुढील कार्यवाही विभाग स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील विक्रोळी पूर्व-पश्चिम उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६) ३५४ (१७-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी पूर्व-पश्चिम उड्डाणपुलाचे काम अद्याप पूर्ण झाले नसून सदर प्रकल्पाचा खर्च ३३ कोटी रुपयांवरून ९५ कोटींपर्यंत गेला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान

निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन प्रकल्पाचे काम विहित वेळेत पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांवर व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली तसेच उड्डाणपुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर उड्डाणपुलाच्या कामाच्या निविदेनुसार रुपये ३७.०६ कोटी इतक्या रकमेचे कंत्राट देण्यात आले होते. तद्नंतर पुलाच्या बांधकामासाठी रस्ता अरुंद असल्याने व रेल्वे स्टेशनला जोडणारा मार्ग अतिरहदारीचा असल्याने वाहतुकीसाठी अडथळा टाळण्याकरीता सुपर स्ट्रक्चरच्या डिझाईनमध्ये व कार्यपध्दतीमध्ये बदल करण्यात आले. त्यानुसार सदर कामावर नियुक्त तांत्रिक सल्लागार मे.टेक्नोजेम कन्सल्टंट प्रा. लि. यांनी तयार केलेल्या रचनेमध्ये फेरतपासणी सल्लागार आय.आय.टी. मुंबई या केंद्रीय संस्थेकडून मुख्य गर्डरच्या तळाच्या प्लेटची जाडी (Bottom Plate) २५ मी.मी. वरुन ३६ मी.मी. वाढविण्याबाबत सुचविले. तसेच, मुख्य गर्डरच्या वरच्या भागाच्या प्लेटची रुंदी (Top Flange) ४७०*२५ मी.मी. वरुन ५५०*२५ मी.मी. ने वाढविण्याबाबत सुचविले आणि डेक स्लॅबची जाडी ३०० मी.मी. वरून सुमारे ३५० मी.मी. झाली आहे. त्यानुसार स्लॅबमधील काँक्रीटचे व सळयांचे प्रमाण (Slab Reinforcement) वाढले असल्याने सदर कामाच्या दर पत्रिकेमधील (BOQ) परिमाणामध्ये वाढ झालेली आहे. ह्या सर्व बदलामुळे कामाच्या खर्चात ९५ कोटीपर्यंत वाढ झाली.

सदर उड्डाणपुलाचे सद्य:स्थितीत ९०% काम पूर्ण झाले असून लवकरात लवकर काम पूर्ण करुन सदर उड्डाणपुल खुला करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलबार हिल (मुंबई) परिसरात पहिली तरंगती पायवाट सुरु करण्याबाबत

**(७) ३५६ (१७-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मलबार हिल परिसर, मुंबई येथे पहिली तरंगती पायवाट (एलिव्हेटेड फॉरेस्ट वॉकवे) बांधण्याबाबतच्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले असून, सदर प्रकल्प माहे डिसेंबर, २०२४ मध्ये पर्यटकांसाठी खुला केला जाणार होता, परंतु अद्याप सदर प्रकल्प पर्यटकांसाठी खुला झाला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,एलिव्हेटेड फॉरेस्ट वॉकवे प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०१-२०२६) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मलबार हिल परिसर, मुंबई येथे पहिली तरंगती पायवाट एलिव्हेटेड फॉरेस्ट वॉकवे) बांधण्याबाबतच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले. सदर प्रकल्पाचे काम मुंबई शहरात डोंगर उतारावरील भूभागावर प्रथमच करण्यात आले असून भौगोलिक व तांत्रिक दृष्टया आव्हानात्मक होते. सदर कामात प्रथमच गर्दीच्या नियंत्रणाकरीता प्रवेश नियंत्रण प्रणाली, निसर्ग उन्नत मार्गावर देखरेखीकरीता सी.सी.टी.व्हि बसविणे, नाविण्यापूर्ण पध्दतीचे प्रवेशव्दार आणि नियंत्रण कक्षाची विशिष्ट प्रकारची बाह्य रचना इत्यादी बाबी प्रस्तावित असल्याकारणाने त्याकरीता त्यांचे काटेकोरपणे आराखडे, संरचना तयार करणे व काम पूर्ण झाल्यानंतर निसर्ग उन्नत मार्ग प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यापूर्वी सर्व बाबीं सुरळीतपणे असल्याबाबतची खातरजमा करुन घेणे आवश्यक होते. सद्य:स्थितीत सदर प्रकल्पातील उन्नत मार्ग नियंत्रण कक्ष संरचना, प्रवेश नियंत्रण प्रणाली व संबंधित सर्व कामे पूर्णत्वास जाऊन प्रकल्पाचे दिनांक ३० मार्च २०२५ रोजी लोकार्पण करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील अ‍ॅन्टॉप हिल परिसरातील १० फिरती शौचालये अज्ञात व्यक्तींनी जाळली असल्याबाबत

**(८) ३५८ (१७-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)अ‍ॅन्टॉप हिल (मुंबई) येथील गोवारी स्मशानभूमी परिसरातील शौचालयाच्या पुनर्बांधणीचे काम पालिकेने हाती घेतल्यामुळे रहिवाशांच्या सोयीसाठी तात्पुरते फिरते फायबरचे शौचालय कंत्राटदाराने गेट क्रमांक ४ जवळ उभे केले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदर फिरत्या शौचालयातील फायबरची १० शौचकुपे अज्ञात व्यक्तींनी जाळून टाकल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी तक्रार दाखल केली आहे काय, त्यानुसार तपास सुरु करण्यात आला आहे काय, असल्यास, तपासात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) कंत्राटदार मे. आर्मस्ट्रॉग (इंडीया) कन्स्ट्रक्शन्स यांनी दिनांक ०३/०१/२०२५ रोजी अ‍ॅन्टॉप हिल पोलीस स्टेशन येथे सदर घटनेबाबत तक्रार दाखल केली आहे. त्याअनुषंगाने अ‍ॅन्टॉप हिल पोलीस स्टेशन येथे प्रथम खबरीय अहवाल अदखलपात्र गुन्हा नोंदणी क्र.२४ अन्वये नोंदविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यात विविध शासकीय कार्यालयासाठी बांधलेल्या शासकीय इमारतीमध्ये कामकाज अद्याप सुरू झाले नसल्याबाबत

**(९) ४५३ (१७-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात विविध शासकीय कार्यालयांसाठी शहरात अनेक इमारती बांधण्यात आल्या आहेत, परंतु या शासकीय इमारतीमध्ये शासकीय कामकाज अद्याप सुरू करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासकीय कामकाजासाठी बांधण्यात आलेल्या इमारतींचा वापर शासकीय कामासाठी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) पूर्ण झालेल्या शासकीय इमारती हस्तांतरित करणेबाबत उपभोक्ता खात्याकडे ताबा पावती पाठविली असून हस्तांतरणाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील शताब्दी रुग्णालयात ईसीजी टेक्निशियनचे पद भरण्याबाबत

**(१०) ५०६ (१७-०४-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (मुंबई) येथील महानगरपालिकेचे पंडित मदनमोहन मालवीय शताब्दी रुग्णालयात सुमारे ३५ टक्के पदे रिक्त असून सदर रूग्णालयातील चतुर्थश्रेणी संवर्गातील १ पुरूष सफाई कर्मचारी स्त्री व पुरूष रूग्णांचे ईसीजी काढत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अनेक निवेदने देऊनही महानगरपालिका याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने काही स्थानिक रहिवाशांनी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयामधील सदर गंभीर प्रकारामुळे सर्वसामान्यांमधून रुग्णालयाच्या प्रशासनाविरुध्द रोष निर्माण होत असून यासंदर्भात शासनाने चौकशी करून सदर रुग्णालय प्रशासनावर कारवाई करुन तसेच या रुग्णालयातील ईसीजी टेक्निशियनचे पद तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे तसेच उक्त रूग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

बाह्य रुग्ण, तात्काळ विभाग व इतर ठिकाणी उपचारासाठी लागणारे सर्व विद्युत हृदय आलेख (ECG) डॉक्टर काढतात. परंतु, शस्त्रक्रीया व इतर fitness साठी येणाऱ्या रुग्णांचे विद्युत हृदय आलेख (ECG) या रुग्णालयातील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत डॉक्टरांच्या पर्यवेक्षणा खाली काढले जातात. या विद्युत हृदय आलेखाचा (ECG) रिपोर्ट डॉक्टरांकडून fitness देताना तपासणी करण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने निम्न वैद्यकीय वर्गांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती प्रक्रिया कार्यान्वित केली आहे.

(४) सदर प्रकरणी रुग्णालय प्रमुखांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून ज्ञापन देण्यात आले असून सदर प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये याबाबत सक्त ताकित देण्यात आली आहे. रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कडेगाव (जि.सांगली) नगरपंचायतीचा घनकचरा ठेक्यासाठी जास्तीचा खर्च होत असल्याबाबत

**(११) ५८७ (१६-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)कडेगाव (जि.सांगली) नगरपंचायतीचा घनकचरा ठेक्यासाठी अपेक्षेपेक्षा जास्त निधी खर्च होत असल्याने नगरपंचायतीच्या खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कडेगाव नगरपंचायतीच्या वार्षिक घनकचऱ्यासाठी उत्पन्नाच्या किती टक्के रक्कम खर्च करण्यात येते तसेच यासंदर्भातील मागील पाच वर्षातील लेखाजोखा शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, कडेगाव नगरपंचायतीकडून होणाऱ्या अवाजवी खर्चास निर्बंध घालण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) केंद्र शासनाच्या वित्त आयोगाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमधून ५० टक्के इतका निधी घनकचरा व्यवथापनावर खर्च करणे बंधनकारक आहे.

कडेगाव नगरपंचायतीस १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत सन २०१६-२०१७ ते सन २०१९-२०२० पर्यंत एकूण रुपये ६,०३,६५,५३९/- इतका निधी प्राप्त झाला असून त्यापैकी घनकचरा संकलन ठेक्यासाठी सन २०२२-२३ पर्यंत रुपये ३,७४,८४,२१०/- इतका निधी खर्च झालेला आहे. तसेच, १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत सन २०२०-२०२१ ते सन २०२४-२०२५ पर्यंत एकूण रुपये २,६९,८६,४७०/- इतका निधी नगरपंचायतीस प्राप्त झाला असून त्यापैकी घनकचरा संकलन ठेक्यासाठी रुपये १,०१,४४,७३२/- इतका निधी खर्च झालेला आहे.

(३) कडेगांव नगरपंचायतीकडून घनकचरा व्यवस्थापन कामासाठी अवाजवी खर्च करण्यात आल्याचे दिसून आले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईच्या बेस्ट सेवेत सुधाणा करण्याबाबत

**(१२) ६२४ (१७-०४-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकल ट्रेन इतकीच बेस्ट सेवा देखील महत्त्वाची आहे परंतु, गत काही वर्षात ही सेवा कोलमडल्यामुळे सन २०१७ नंतर बेस्ट प्रशासन व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या समन्वयाअभावी बेस्टच्या ताफ्यात स्वमालकीच्या एकूण ९२५ बसेस शिल्लक असून खाजगी कंत्राटदारांच्या १९५० इतक्या बसेसची तफावत असल्यामुळे बस सेवेवर दुष्परिणाम झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत वीस वर्षांपूर्वी बेस्टच्या ताफ्यामध्ये एकूण ४ हजार ७०० बसेसमधून ४७ लाख प्रवासी बेस्ट सेवेचा लाभ घेत होते, परंतु आता सदर ताफ्यात २० हजार ९०० बसेस असूनही प्रवासी संख्या ३९ लाख इतकी घसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई, नवी मुंबई, ठाणे त्याचबरोबर पालघरच्या पुढे विस्तारणारी मुंबई पाहता त्याअनुषंगाने बेस्टचा उत्कृष्ट गुणवत्तेसह विस्तार करण्याबाबत तसेच १९५० इतक्या बसेसची तफावत दुर करुन स्वमालकीच्या बसेस खरेदीसाठीच्या निधीबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे अशत: खरे आहे.

बेस्ट उपक्रमाच्या स्वमालकीच्या बसगाड्यांचे आयुर्मान संपुष्टात आल्याने बहुतांश बसगाड्या सेवेतून निष्कासित करण्यात येत आहेत. प्रवाशांची गैरसोय दुर करण्याकरीता उपक्रमाच्या वतीने भाडेतत्ववावरील बसगाड्या बसताफ्यात सामाविष्ट करण्यात येत आहेत. आजमितीस बेस्ट उपक्रमाच्या ताफयात स्वमालकीच्या एकूण ६१२ बसगाड्या असून भाडेतत्वावरील बसगाड्यांची संख्या २११९ एवढी आहे.

परंतु सदर बसगाड्यांचे प्रमाण कमी असल्यामुळे प्रवाशांची काही प्रमाणात गैरसोय होत आहे.
(२) हे खरे आहे.

सन २०२४ तुलनेत पुरेशा बसताफ्या आभावी उपक्रमाच्या बससेवेवर प्रवास करणाऱ्या दैनंदिन प्रवाशांची संख्या सरासरीपेक्षा कमी आहे. सबब, प्रवासी संख्या वाढवून उपक्रमाचे महसूल वाढीचे प्रयत्न सुरु आहेत.

सद्य:स्थितीत उपक्रमाच्या बसताफयात एकूण २७३१ बसगाड्या असून प्रवासी संख्या सरासरी २९ लाख एवढी आहे.

(३) नविन बसगाड्या खरेदी करण्याकरीता भांडवली निधीची आवश्यकता आहे. बेस्ट प्रशासन आणि कामगार संघटनांमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या समन्वयाने झालेल्या सामंज्यस्य करारानुसार स्वःमालकीच्या बसताफा ३३३७ ठेवण्याकरीता बेस्ट उपक्रमातर्फे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे निधीची पुर्तता करण्यासंबंधी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील शाळामधील शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(१३) ८३७ (१६-०४-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत पवित्र पोर्टल (Pavitra Portal Teacher Recruitment) प्रक्रियेतून शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यास्तव पात्र' उमेदवारांची यादी शासनाने महानगरपालिकेला पाठविली असून त्यापैकी पात्र ठरलेले आणि निवड झालेले सर्व शिक्षक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांवर प्रत्यक्ष रूजू झाले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन यंत्रणेने पात्र उमेदवारांची यादी पाठविल्यानंतर सदर शिक्षकांचा शाळांवर प्रत्यक्ष रुजू होण्याचा कालावधी कोणता आहे, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेने सदर उमेदवारांना शाळेत रुजू करुन घेतले आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमधील पात्र ठरलेले आणि निवड झालेले उमेदवार तसेच महिला शिक्षक उमेदवार हे राज्यातील अन्य भागातून आले असून त्यांना मुंबईत निवास व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे उद्भवणाऱ्या अनेक समस्यांचे निराकरण करुन त्यांना विहित कालावधीत शाळांवर प्रत्यक्ष रुजू करुन घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पात्र उमेदवारांनी नियुक्ती आदेश स्वीकारल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीमध्ये त्यांच्या नियुक्त शाळेमध्ये रुजू होणे आवश्यक आहे. नियुक्ती आदेशानुसार सदर उमेदवारांना शाळेत रुजू करुन घेण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील मारूती नगर, संभाजी नगर ते एन.जी.पार्क, सिद्धार्थ नगर ते देवीपाड्याला जोडणाऱ्या डीपी रस्त्यांची निर्मिती करणेबाबत

**(१४) ११७६ (१७-०४-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील मारूती नगर येथील डीपी रस्ता, संभाजी नगर ते एन.जी.पार्क डीपी रस्ता, सिद्धार्थ नगर ते देवीपाड्याला जोडणारा डीपी रस्ता या रस्त्यांची निर्मिती करण्याची मागणी स्थानिकांनी केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यांची तातडी लक्षात घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर रस्ता निर्मिती करण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशाप्रकारची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने याबाबत कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०१-२०२६) :** (१) होय, खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मारुती नगर येथील रस्ता महानगरपालिकेस ताब्यात देणेकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व्दारे कळविण्यात आले आहे. संभाजी नगर ते एन.जी.पार्क येथील प्रस्तावित विकास नियोजित रस्त्यांचा भाग पूर्णपणे अतिक्रमित असल्यामुळे विकास नियोजित रस्त्याचे पुर्नआलेखन (realignment) महानगरपालिके मार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील बोरीवली (पूर्व) येथील अभिनव नगरमध्ये युपीएससी व एमपीएससी सेंटरसाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत

**(१५) ११७७ (१७-०४-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अभिनव नगर,बोरीवली (पूर्व), मुंबई येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सिव्हिल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट ॲण्ड रिसर्च सेंटर सुरु करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभिनव नगर परिसरातील विद्यार्थ्यांसाठी युपीएससी व एमपीएससी प्रशिक्षण वर्गाकरीता सीटीआयआरसीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०१-२०२६) :** (१) अभिनव नगर, बोरीवली (पूर्व), मुंबई येथे सन १९८६ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र (Civic Training Institute and

Research Centre) स्थापीत करण्यात आलेले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) तत्कालीन विधानपरिषद सदस्य यांनी युपीएससी व एमपीएससी मार्गदर्शन केंद्रासाठी जागा उपलब्ध करणे यासंदर्भात दिनांक ०१/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली होती. सदर विनंती अमान्य करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## वसई- विरार महानगरपालिकेत २९ गावांचा समावेश करण्याबाबतच्या शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत

**(१६) ११९६ (१७-०४-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई- विरार महानगरपालिकेत २९ गावांचा समावेश करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेतून २९ गावे वगळण्यासाठी हजारो अर्ज ग्रामस्थांनी शासनाकडे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय ?
(३) असल्यास, ग्रामस्थांची आग्रही मागणी विचारात घेऊन ही २९ गावे वसई-विरार महानगरपालिकेतून वगळण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

दिनांक ३१ मे, २०११ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेतून वगळलेली २९ गावे महानगरपालिकेत पुन:श्च समाविष्ट करण्याबाबत दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली असून सदर २९ गावांचा वसई विरार शहर महानगरपालिकेत समावेश करण्यात आला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

विभागीय आयुक्त यांच्या दिनांक १७ मार्च, २०२५ रोजीच्या अहवालानुसार वसई विरार महानगरपालिकेतून ११,८३१ अर्जदार २९ गावे वगळण्याबाबत व १९,५५८ अर्जदार गावे पुनश्च: समाविष्ट करण्याच्या बाजूने होते.
(३) विभागीय आयुक्त, कोकण यांनी नागरिकांचे अर्ज हरकती व सूचना इ.बाबी तपासून सर्व प्रक्रिया पूर्ण करून शासनास अहवाल सादर केला. त्यान्वये दिनांक ३१ मे, २०११ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेतून वगळलेली २९ गावे महानगरपालिकेत पुन:श्च समाविष्ट करण्याबाबतचा निर्णय दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या अधिसूचनेन्वये घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती नगरपंचायतीच्या पात्र लाभार्थ्यांपैकी एकालाही घरकुल योजनेचा लाभ मिळाला नसल्याबाबत

**(१७) १३६० (१७-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने ग्रामीण भागांसह नागरी भागातही आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्यांना हक्काचा निवारा मिळावा या हेतूने पंतप्रधान आवास योजना सुरु केली असून जिवती नगरपंचायतीच्या (ता.जिवती, जि.चंद्रपूर) ६६४ पात्र लाभार्थ्यांपैकी एकाही लाभार्थ्याला उक्त घरकुल योजनेचा लाभ मिळाला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिवती नगरपंचायतीकडून व प्रशासनाकडून झालेल्या दुर्लक्षामुळे पात्र असूनही एकाही लाभार्थ्यांला पंतप्रधान आवास घरकुल योजनेचा लाभ मिळाला नाही परिणामी त्यांच्या कुटुंबीयांना मोठ्या प्रमाणात समस्यांना सामोरे जावे लागत असून प्रशासनाकडचे घरकुल वाटप योजनेमध्ये दुर्लक्ष होण्याची कारणे काय आहेत,

(३)असल्यास, जिवती नगरपंचायतीच्या पंतप्रधान आवास घरकुल योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे,

जिवती नगरपंचायतीमार्फत वन विभागास बांधकामाकरीता ना-हरकत मिळण्याबाबत विनंती करण्यात आली होती. तथापि, वन विभागाकडून घरकुल बांधकामास ना-हरकत न मिळाल्याने पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला नाही.

(३) व (४) जिवती नगरपंचायत हद्दीतील लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना दिनांक १४/०८/२०१९ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला. तसेच जिवती नगरपंचायतीमार्फत बांधकाम परवानगीची मागणी करण्यात आली आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र.३६६९/२००९ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार जिवती तालुक्यातील एकूण २८२०८.२८५ हे. क्षेत्र विवादित असल्याने, वन विभागाकडून घरकुल बांधकामास परवानगी देण्यात आली नाही.

तथापि, प्रधानमंत्री आवास योजनेच्या केंद्रीय मंजुरी व संनियंत्रण समितीच्या (CSMC) दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीत सदरचा प्रकल्प रद्द करण्यात आला आहे.

---

## पिंपरी शहरातील पवना इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाची कामे सुरु कण्यासाठी महानगरपालिकेने निधीचे नियोजन करण्याबाबत

**(१८) १३६९ (१७-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी शहरातील मुळा नदी सुधार प्रकल्पाचे काम सुरू झाले असून पवना व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाची कामे तात्काळ सुरु करण्यासाठी अमृत निधी मिळणार असून महानगरपालिकेकडून कर्जरोखे

(बॉण्डद्वारे) व इतर माध्यमातून निधी उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०३-२०२६) :** (१), (२) व (३) पवना व इंद्रायणी नद्यांच्या पुनरुज्जीवन करण्याच्या अनुषंगाने विविध विकास प्रकल्प राबविण्यासाठी रुपये २०० कोटी पर्यंत कर्ज रोखे उभारण्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच, केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत रुपये ५२५.८२ कोटी किंमतीच्या इंद्रायणी सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

---

## नरखेड प्रशासकीय इमारतीचे (जि.नागपूर) उद्घाटन करुन कार्यालय सुरु करण्याबाबत

**(१९) १४८५ (१७-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)नरखेड प्रशासकीय इमारतीचे (जि.नागपूर) कार्यालय सुसज्ज होऊन ६ महिने झाले, असूनही अद्यापपर्यंत कार्यालयाचे उद्घाटन झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यालय हे शासकीय वसतिगृहात स्थानांतरीत केल्याने तालुक्यातील गरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता हक्काचे वसतिगृह असूनही गत तीन वर्षापासून भाड्याच्या जागेत राहून शिक्षण घ्यावे लागत असल्याने त्यांना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नरखेड प्रशासकीय इमारतीचे (जि.नागपूर) तातडीने उद्घाटन करुन कार्यालय सुरु करण्याबाबत तसेच तेथील गरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काचे शासकीय वसतिगृह वापरण्यास मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२६-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
सदरील प्रशासकीय इमारत पूर्ण होऊन दिनांक ०१/०२/२०२५ रोजी इमारतीचे उद्घाटन झाले असून सदर इमारतीचा वापर सुरू आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर कॉरिडॉर संदर्भातील विस्तीर्ण आराखडा तयार करण्याबाबत

**(२०) ४६४० (१२-०९-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर कॉरिडॉर संदर्भातील विस्तीर्ण आराखडा सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून तयार करण्यात आला असून यामध्ये शहरातील ज्या लोकांची दुकाने बाधित होत आहेत त्यांना दुकाने दिली जातील तसेच सर्वांना विश्वासात घेऊन पुढील तीन महिन्यात भूसंपादन प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याची माहिती मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिली असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध प्रकल्पासंदर्भात ज्या नागरिकांच्या मालमत्ता अधिग्रहित करण्यात आल्या त्या सर्व प्रकल्पग्रस्तांना पंढरपूर कॉरिडॉर प्रमाणेच नुकसान भरपाई देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंढरपूर कॉरिडॉरसाठी शासनाने कोणता कृती आराखडा तयार केला आहे व या कृती आराखड्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच नुकसान भरपाईबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

पंढरपूर कॉरिडॉर संदर्भातील विस्तीर्ण आराखड्याचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, सोलापूर स्तरावर सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) जिल्हाधिकारी स्तरावर आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) लागू नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.